Pune Police

# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ /२०१६. पुणे शहर, दिनांक - २४.११.२०१६

**विषय :- दिनांक- २७/११/२०१६ रोजी संविधान सन्मान (मूक) मोर्चाचे अनुषंगाने करण्यात येणा-या वाहतूकीचे बदला बाबत.**

दिनांक २७/११/२०१६ रोजी पुणे शहरात संविधान सन्मान(मूक) मोर्चा हा शहरातील गरवारे पूल येथील संभाजी पुतळा येथून सुरु होऊन तो खंडोजीबाबा चौक - टिळक चौक - लक्ष्मी रोडने - संतकबीर चौक येथून डावीकडे वळून —पॉवर हाऊस चौक उजवीकडे वळून समर्थ पोलीस स्टेशन समोरून पुढे बॅनर्जी चौक-उजवीकडे वळून नेहरू मेमोरियल समोरून आंबेडकर पुतळा येथून डावीकडे वळून पुढे इस्कॉन मंदीर डावीकडे वळून हॉटेल ब्ल्यु नाईल समोरुन उजवीकडे वळून कौन्सील हॉल चौक असा जाणार असल्याने नागरिकांची गैरसोय होऊ नये व वाहतूक सुरळीत रहावी या करीता दिनांक-२७/११/२०१६ रोजी सकाळी ०७.०० वाजे पासून ते मोर्चा संपेपर्यंत आवश्यकत्तेनुसार वाहतूकीकरीता खालील रस्ते बंद राहतील व वाहतूकीची कोंडी निर्माण होऊ नये म्हणून खालील पर्यायी मार्ग देण्यात आले आहेत.

## कॅम्प येथील कौन्सील हॉल परिसरातील वाहतूकीस बंद असलेले रस्ते-

१. बोल्हाई चौक ते पुणे स्टेशन(ससून रोड)
२. बोल्हाई चौक ते साधु वासवानी पुतळा(फायनान्स रोड)
३. बोल्हाई चौक ते आंबेडकर पुतळा( मोलेदिनारोड)
४. मुख्य पोस्ट ऑफीस ते बोल्हाई चौक
५. पॉवर हाऊस चौक ते बॅनर्जी चौक(मुदलीयार रोड)
६. किराड चौक ते एसबीआय चौक(चर्चरोड)
७. नेहरु हॉल चौक ते जहांगीर चौक(साधू वासवानी रोड)
८. दोराबजी मॉल चौक ते मंगलदास चौक
९. एसबीआय हाऊस ते ब्ल्यु नाईल(तारापोर रोड)
१०. सदर्न कमांड सिग्नल ते साधु वासवानी पुतळा(मानेकशॉ मेहतारोड)
११. सर्कीट हाऊस चौक ते अलंकार चौक( जनरल वैद्य रोड)
१२. क्वार्टर गेट चौक ते संत कबीर चौक(लक्ष्मीरोड)
१३. क्वार्टर गेट चौक ते कादर चौक
१४. नेहरु हॉल चौक ते जे.जे.गार्डन
१५. आरटीओ चौक ते बोल्हाई चौक
१६. संचेती हॉस्पीटल चौक ते शाहिर अमर चौक(वेलस्लीरोड)
१७. क्वार्टर गेट ते शांताई हॉटेल चौक(डॅमरोड)
१८. अपोलो सिनेमा ते पॉवर हाऊस चौक(मुदलीयार रोड)

वरील नमुद रस्ते व त्यांना जोडणारे इतर लहान रस्ते वाहतुकीकरिता बंद राहतील.

## पर्यायीमार्ग /डायव्हर्शन-

१) स्वारगेट परिसरातून शिवाजीनगरकडे जाणाऱ्या नागरिकांनी जेधे चौक, जमनालाल बजाज पुतळा चौक, डावीकडे वळून सावरकर चौक, उजवीकडे वळून सिंहगड रोड मार्गे, सिंहगड रोड जंक्शन, उजवीकडे वळून शास्त्री रोडने सेनादत्त चौकी चौक, डावीकडे वळून म्हात्रे पुलावरुन महादेव मंदिर चौक, नळस्टॉप मार्गे जावे किंवा सिंहगड रोड जंक्शनवरुन सरळ सिंहगड रोडने राजाराम पुलमार्गे जावे.

२) स्वारगेट/सोलापुर रोड वरुन पुणे स्टेशन परिसरामध्ये जाणाऱ्या नागरिकांनी गोळीबार मैदान चौक, इस्ट स्ट्रिटने किंवा खान्यामारुती चौक, उजवीकडे वळून मम्मादेवी चौक, अर्जुन रोड जंक्शन, डावीकडे वळून अर्जुन रोडने मोरओढा चौक, उजवीकडे वळून सर्किट हाऊस चौक, साधुवासवानी पुलावरुन ब्ल्यु डायमंड चौक, डावीकडे वळून मंगलदास चौक, बंडगार्डन रोडने इच्छितस्थळी जावे.

३) सोलापूर रोडने डेक्कन परिसरामध्ये जाणाऱ्या नागरिकांनी जेधे चौक, जमनालाल बजाज पुतळा चौक, डावीकडे वळून सावरकर चौक, उजवीकडे वळून सिंहगड रोड मार्गे, सिंहगड रोड जंक्शन, उजवीकडे वळून शास्त्री रोडने सेनादत्त चौकी चौक, डावीकडे वळून म्हात्रे पुलावरुन महादेव मंदिर चौक, नळस्टॉप मार्गे जावे किंवा सिंहगड रोड जंक्शनवरुन सरळ सिंहगड रोडने राजाराम पुलमार्गे जावे.

४) नगर रोडवरुन स्वारगेट परिसरामध्ये जाणाऱ्या नागरिकांनी १.खराडी बायबास रोडने मगरपट्टा मार्गे, मुंढवा रोड जंक्शन, उजवीकडे वळून सोलापूर रोडवरुन इच्छितस्थळी जावे.

५) नगर रोडवरुन शिवाजीनगर / कोथरुड परिसरामध्ये जाणाऱ्या नागरिकांनी पर्णकुटी चौक, महात्मा गांधी उद्यान, उजवीकडे वळून बंडगार्डन रोडने, आरटीओ चौक, इंजिनीअरींग कॉलेज चौक, स.गो. बर्वे चौक, सिमला ऑफिस चौक, डावीकडे वळून गणेशखिंड रोडवरुन सेनापती बापट रोडने इच्छितस्थळी जावे.

आवश्यकता भासल्यास शास्त्रीनगर चौक, गोल्फ क्लब चौक, आंबेडकर चौक, सादलबाबा चौक, संगमवाडी मार्गे इंजिनीअरींग कॉलेज चौक येथुन इच्छितस्थळी.

६) टिळक रोडवरुन डेक्कनकडे जाणाऱ्या नागरिकांनी टिळक रोड, अलका टॉकीज चौक, डावीकडे वळून सेनादत्त चौकी चौक, म्हात्रे पुलावरुन इच्छितस्थळी जावे.

७) **बाजीराव रोड** हा पुरम चौकामधुन व शिवाजी रोड हा गाडगीळ पुतळा चौकातून बंद राहणार आहे.

८) **जंगली महाराज रोड** हा स.गो.बर्वे चौकामध्ये बंद राहणार आहे. कोथरुड/पौड रोड परिसरामध्ये नाहणा-या नागरीकांनी सिमला चौक गणेशखिंड रोडचा वापर करावा.

९) **कर्वे रोड** नळस्टॉप चौकातून बंद राहील पौडरोड व कर्वेरोड वरुन येणा-या वाहन चालकांनी शिवाजीनगर परिसरामध्ये जाण्याकरीता लॉ-कॉलेज रोड मार्गे, गणेशखिंड रोडने इच्छितस्थळी जावे.

१०) **केळकर रोड** परिसरामधील नागरीकांसाठी आवश्यकतेप्रमाणे गाडगीळ पुतळा, कुंभारवेस, शाहिर अमरशेख चौक, आरटीओ चौक असा रस्ता सुरु राहील.

११) **एफ सी रोड** खंडोजीबाबा चौक ते चाफेकर चौकापर्यंत बंद राहील नागरीकांनी लॉ-कॉलेज रोडचा वापर करावा.

१२) **नेहरुरोड** सेव्हनलव्ह चौकामधून पुणे स्टेशनकडे बंद राहील.

तरी सदर रस्त्यांचा वापर करणा-या सर्व वाहनचालकांनी / नागरीकांनी आपली गैरसोय टाळण्याकरीता वरील नमुद वेळे पुरता सदर रस्त्याचा वापर टाळून इच्छितस्थळी जाण्याकरीता इतर नमूद पर्यायी मार्गाचा वापर करावा.

याखेरीज मोर्चा मार्गावरील वाहतूक आवश्यकतेनुसार कमीत-कमी वेळाकरीता वळविण्यात येणार आहे. तरी सर्व नागरिकांनी वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक शाखा, पुणे शहर यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

(डॉ प्रविण मुंढे)

